## महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ दीक्षित यांना `कंस्ट्रक्शन वर्ल्ड पर्सन ऑफ द इयर २०२०' पुरस्कार

# अभूतपूर्व कामाकरिता डॉ दीक्षित यांची या मानाच्या पुरस्काराकरिता निवड

संबंधित वर्षात या क्षेत्रात अभूतपूर्व काम करत आपल्या कंपनीसह बांधकाम व्यवसायाला पुढे नेणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. हा कार्यक्रम आभासी पद्धतीने १६ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५ वाजता होणार आहे.

सात सदस्य असलेल्या ज्युरीने डॉ दीक्षित यांची या पुरस्काराकरता निवड केली आहे. श्री बेंजामिन ब्रिन, व्यवस्थापकीय संचालक, प्रमुख, एशिया पॅसिफिक बांधकाम विभाग, प्रोजेक्ट मॅनॅजमेण्ट इन्स्टिट्यूट, श्री विपुल रुंगटा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, एचडिएफसी कॅपिटल एडव्हायसर्स, श्री प्रदीप सिंह, माजी उपाध्यक्ष, आयडिएफसी प्रोजेक्ट्स, श्री विजय अग्रवाल, कार्यकारी संचालक, एक्वीरस कॅपिटल, श्री आर के नारायण, मुख्य संचालन अधिकारी, ऑलकार्गो लॉजिस्टिक्स पार्क प्रायव्हेट लिमिटेड, श्री मोहम्मद अली जाना, अध्यक्ष, आयएफएडब्लूपीसीए, मालदीव आणि श्री फरीद अहमद, विभागीय प्रमुख, विक्री, अपोलो टायर्स हे ज्युरी सदस्य आहेत.

महा मेट्रो च्या नागपूर आणि पुणे प्रकल्पाचे टीम लीडर म्हणून त्यांनी आजवर संपादित केलेल्या यशा करिता डॉ दीक्षित यांना हा पुरस्कार दिला जातो आहे. नागपुर मेट्रो प्रकल्पा च्या एकूण ४ पैकी २ मार्गावर प्रवासी सेवा सुरु झाली आहे (कोव्हीड मुळे तात्पुरता हि सेवा बंद आहे). या दोन मार्गिकांचे एकूण अंतर २५ किलोमीटर असून ५० महिन्यात हे काम पूर्ण झाले आहे. पुणे मेट्रोचे १५ किलोमीटरचे व्हायडक्टचे काम , २ किलो मीटरचे भुयारी मार्गांचे (TBM ) काम केवळ ३६ महिन्यात पुर्ण केले आहे. पुणे मेट्रोच्या १० स्थानकांची कामे ६० टक्के पुर्ण झाली आहेत . दुसऱ्या शब्दात सांगायचे तर दर् दोन महिन्याला एका किलोमीटर लांबीच्या ट्रॅकचे कार्य महा मेट्रोने पूर्ण केले. संपूर्ण देशात या गतीने काम होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर, महा मेट्रो नागपूरने २०१७ मध्ये व पुणे मेट्रोने डिसेंबर २०१९ मध्ये म्हणजे केवळ ३० महिन्यात ट्रायल रन घेतले. इतक्या कमी काळात ट्रायल रन घेण्याचा हा एक विक्रम आहे. पण कामाची हि गती केवळ ट्रायल रन घेण्यापर्यंत थांबली नाही तर कोव्हीड नंतर निर्माण झालेल्या लॉकडाऊन च्या परिस्थतीमुळे सर्वत्र कामावर परिणाम झाला असताना, त्याच काळात महा मेट्रोने कामगारांची संख्या समाधानकारक नसतानाही, आपल्या ४ स्टेशनचे काम पूर्ण केले आणि आता ते स्टेशन प्रवासी सेवे करीता सज्ज आहेत.

डॉ दीक्षित यांच्या नेतृत्वात महा मेट्रोने अनेक पारितोषिके पटकावली आहेत. यात बेन्टली इयर इन् इन्फ्रास्ट्रक्चर २०१७, सॅप एस अवॉर्ड २०१८, आयसीआय (नागपूर) अल्ट्राटेक अवॉर्डचा समावेश आहे. अर्बन मोबिलिटी इंडिया (युएमआय) - या देश पातळीवर आयोजित होणाऱ्या संमेलनात प्रदर्शित केलेल्या साहित्याला सलग चार वर्ष प्रथम पुरस्कार मिळाला आहे. जागतिक सुरक्षा दिनाच्या निमित्ताने महा मेट्रो आपल्या कामा दरम्यान कश्या प्रकारे सुरक्षा संबंधी नियमांचे आणि संकेतांचे पालन केले जाते हे दाखवण्याकरता मोठी मानवी शृंखला तयार केली होती, याची दखल घेत या घटनेची नोंद लिमका बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने केली. पर्यावरणा संरक्षणासंबंधीचे निकष पाळल्यामुळे महा मेट्रो च्या स्टेशनला इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलतर्फे प्लॅटिनम दर्जा मिळाला असून हि अभिमानाची बाब आहे. पर्यावरणासंबंधी निकष पाळल्यामुळे महा मेट्रोला आयएसओ (ISO) १४००१ - २०१५ प्रशस्तीपत्र देखील प्राप्त झाले आहे.

महा मेट्रो हि फार थोड्या संस्थांपैकी एक आहे ज्याला आजवर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. म्हणूनच अश्या संस्थे च्या प्रमुखांचे या सारख्या महत्वाच्या पुरस्काराकरिता निवड होणे अतिशय स्वाभाविक आहे.

महा मेट्रोच्या कामाच्या गतीची आणि गुणवत्तेची नोंद सर्वांनी घेतली आहे आणि त्याकरिता प्रशंसा देखील मिळाली आहे. हाच फरक महा मेट्रो आणि देशात सुरु असलेल्या अनेक इतर प्रकल्पांमध्ये आहे. आणि नेमक्या याच कारणांकरिता तेलंगण सरकारने आपल्या राज्यातील वारंगल येथे मेट्रो प्रकल्प सुरु करण्याकरिता महा मेट्रोची मदत मागितली आहे.

पुणे व नागपूर शहरात मेट्रो रेलची उभारणी करीता डॉ दीक्षित यांच्या प्रयत्नांची दखल फर्स्ट कंस्ट्रक्शन कौन्सिलने घेतली असून या प्रतिष्ठेच्या पुरस्काराकरिता त्यांची निवड केली. डॉ दीक्षित यांनी या पुरस्काराचे श्रेय गेले अनेक वर्ष महा मेट्रोशी संबंधित असणाऱ्या तसेच न थकता व अविरत काम करणाऱ्या सर्व कर्मचारी, अधिकारी, कंत्राटदार, सल्लागार यांना दिले आहे.

